**July 10, 2026**

**To,**
**The Secretary,**
**Corporate Relationship Department,**
**BSE Limited**
**P.J. Tower, Dalal Street**
**Mumbai- MH 400001.**

**Scrip Code: 534733**

**Subject: Newspaper Advertisement of Postal Ballot Notice- Disclosure under Regulation 30 and 47 of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("SEBI Listing Regulations")**

Pursuant to Regulation 30, 47 and other applicable provisions of the SEBI Listing Regulations, we are enclosing herewith copies of Newspaper advertisement of dispatch of Postal Ballot Notice published in the following newspapers on July 10, 2026:

1. Active Times (English Language)
2. Mumbai Lakshadeep (Marathi Language)

The above information can be accessed on the website of the Company at www.aerpace.com.

This is for your information and records.

Thanking You

**For Aerpace Industries Limited**

ANAND MANOJ SHAH
Digitally signed by ANAND MANOJ SHAH
Date: 2026.07.10 13:16:23 +05'30'

**Anand Manoj Shah**
**Managing Director & CFO**
**DIN: 11709310**

Encl: As above

# वाळकी डॅमवर एमडी ड्रग्ज अन् गांजासह तिघे गजाआड; साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त

अमरावती, दि. ९: शहर गुन्हे शाखेने एका धाडसी कारवाईत नांदगाव पेठ परिसराच्या हद्दीतील वाळकी डॅम परिसरातून एमडी व गांजासह एकुण ३ लाख ६३ हजार ४७० रुपयांच्या मुद्देमालासह तीन तस्करांना रंगेहात अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरातील ड्रग्ज तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

९ जुलै रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. सैफ अली आसिफ अली (वय ३२, रा. फरीद नगर), आवेजउद्दीन नासीरउद्दीन (वय २०, रा. हैदरपुरा) आणि मोहम्मद तौसीफ मोहम्मद जफर (वय २४, रा. गौस नगर) अशी अटक आरोपींची नावे आहेत.

वाळकी डॅम्पकडे जाणाऱ्या रोडने काही इसम एमडी 'मॅफड्रॉन' पावडर विकण्याच्या उद्देशाने येणार आहेत, अशी माहिती गुन्हे शाखाप्रमुख अतुल वर यांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी ९ जुलै रोजी दुपारी दोन वाजताच्या सुमारास वाळकी डॅम रोडवर सापळा रचला. या कारवाईदरम्यान तीन आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात तिघांकडे ३ लाख रुपये किमतीचे २२.०७ ग्रॅम एम.डी. पावडर, २२ हजार २७० रुपये किमतीचा १ किलो १२४ ग्रॅम गांजा, ४० हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल फोन असा एकूण ३ लाख ६३ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी हा सर्व मुद्देमाल जप्त केला असून आरोपींविरुद्ध नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात एनडीपीएस ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

**नागपुरातून आणले एमडी**

प्राथमिक चौकशीत हा अंमली पदार्थ आपण नागपूरच्या इरशाद खान उर्फ अरशद याच्याकडून आणल्याची कबुली सैफ अली याने दिली. वाळकी डॅम परिसर हा निर्मनुष्य असतो. तेथे केवळ प्रेमीयुगुलांची येजा असते. त्यामुळे आरोपी तेथे कुणाला एमडी देणार होते, कुणाला गांजाची पुडी देणार होते,

याबाबत गुन्हे शाखेने तपास चालविला आहे. पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वातील एपीआय महेश इंगोले व पीएसआय गजानन सोनुने यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# प्रलंबित दाखल्यांवर डिजिटल स्वाक्षरी; ३५० विद्यार्थ्यांना वेळेत मिळाला दिलासा

रायगड, दि. ९: शैक्षणिक प्रवेशाची अंतिम मुदत जवळ आल्याने अलिबाग प्रांताधिकारी कार्यालयात विविध प्रकारचे सुमारे ३५० दाखले मंजुरीअभावी प्रलंबित राहिले होते. प्रांताधिकारी मुकेश चव्हाण आजारी असल्यामुळे दाखल्यांच्या मंजुरीची प्रक्रिया रखडली होती. या परिस्थितीची माहिती मिळताच आमदार महेंद्र दळवी यांनी तातडीने प्रांताधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या हिताचा प्रश्न मांडला आणि दाखले मंजूर करण्याची विनंती केली.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याची जाणीव ठेवत आजारी अवस्थेतही प्रांताधिकारी मुकेश चव्हाण यांनी डिजिटल स्वाक्षरीद्वारे सर्व प्रलंबित दाखल्यांना मंजुरी दिली. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असलेले दाखले वेळेत उपलब्ध झाले आणि सुमारे ३५० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळले.

दाखले मिळण्यात होणाऱ्या विलंबामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक महाविद्यालयांच्या प्रवेशाची अंतिम मुदत जवळ आल्याने विद्यार्थ्यांच्या भवितव्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती. मात्र, आमदार महेंद्र दळवी यांच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाने तातडीने कार्यवाही केल्याने पालक आणि विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला.

आजारी असतानाही विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत दाखले मंजूर केल्याबद्दल प्रांताधिकारी मुकेश चव्हाण यांचे तसेच प्रश्नाची तातडीने दखल घेऊन प्रशासनाशी समन्वय साधल्याबद्दल आमदार महेंद्र दळवी यांचे पालकांनी आभार मानले. दरम्यान, एखादा अधिकारी अनुपस्थित असताना शासकीय कामकाज ठप्प होऊ नये, यासाठी पर्यायी यंत्रणा अधिक सक्षम करण्याची आवश्यकता असल्याची चर्चा या घटनेनिमित्त पुन्हा पुढे आली.

# मुंढवा जमीन वादात न्यायालयाचा मोठा आदेश; पार्थ पवारांच्या कंपनीचा दस्त रद्द

पुणे, दि. ९: पुण्यातील बहुचर्चित मुंढवा जमीन प्रकरणात महत्त्वाचा न्यायालयीन निर्णय देण्यात आला असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार भागीदार असलेल्या अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी कंपनीच्या नावावरील ४० एकर जमीन खरेदीचा दस्त न्यायालयाने रद्द केला आहे. या निर्णयामुळे पुन्हा एकदा या वादग्रस्त व्यवहाराची चर्चा सुरू झाली आहे.

मुंढवा येथील सुमारे ४० एकर सरकारी मालकीची जमीन बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला भाडेतत्त्वावर देण्यात आली होती. या जमिनीचा सुमारे ३०० कोटी रुपयांचा खरेदी व्यवहार अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपीसोबत करण्यात आला होता. मात्र, या जमिनीचे बाजारमूल्य जवळपास १,८०० कोटी रुपये असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या व्यवहारात आयटी पॉलिसीतील तरतुदींचा गैरवापर करून सुमारे २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क टाळण्यात आल्याचा आरोप आहे. तसेच ३०० कोटी रुपयांच्या व्यवहाराचा दस्त केवळ ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोंदविण्यात आल्याचा मुद्दाही या प्रकरणात चर्चेचा विषय ठरला होता.

प्रकरण वादात सापडल्यानंतर अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपीनेच पुणे जिल्हा न्यायालयात दिवाणी दावा दाखल करून संबंधित दस्त रद्द करण्याची मागणी केली होती. व्यवहारात प्रत्यक्ष पैशांची देवाणघेवाण झाली नसल्याचे, जमिनीचा ताबा हस्तांतरित करण्यात आला नसल्याचे आणि व्यवहार पूर्णत्वास गेला नसल्याचे दोन्ही पक्षांनी न्यायालयात नमूद केले. त्यानंतर न्यायालयाने संबंधित खरेदीचा दस्त रद्द करण्याचा आदेश दिला.

दरम्यान, माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी या संपूर्ण प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, अशा प्रकारच्या प्रकरणांमुळे सरकारी जमिनींच्या व्यवहारांबाबत गंभीर प्रश्न निर्माण होत असून, गैरव्यवहार उघडकीस आल्यानंतर न्यायालयात व्यवहार पूर्ण झाला नसल्याचे सांगून जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच अशा घटनांमुळे प्रशासनावरील जनतेचा विश्वास कमी होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# म्हाडा फसवणूक प्रकरणी भूमी अभिलेख कार्यालयाच्या उपसंचालकांना अटक

नाशिक, दि. ९: म्हाडा घरकुल फसवणूक प्रकरणी पोलिसांनी भूमी अभिलेख कार्यालयाच्या उपसंचालकांनाच अटक केली आहे या प्रकरणात आत्तापर्यंत सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की राज्यात बिल्डरांकडून म्हाडा ला आर्थिक दुर्बल व इतर घटकांसाठी घर द्यावयाची असतात परंतु नाशिक मध्ये महानगरपालिकेची संधान साधून ही घर देण्यात आली नाही याबाबत तक्रार करण्यात आल्यानंतर म्हाडा कडून याबाबतची कारवाई करणारे पत्र देण्यात आले भूमी अभिलेख विभागाच्या वतीने त्याचा तपास सुरू करण्यात आला आणि यामध्ये जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयाचे अधिकारीच प्रथमदर्शनी दोषी आढळले . या सर्व प्रकरणांमध्ये नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या वतीने स्वतंत्र एसआयटीची स्थापना करण्यात आलेली आहे त्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे सर्व साधारण आठ बिल्डर आणि इतर अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला असून त्याचा तपास सुरू आहे. या सर्व प्रकरणाचा तपास करत असताना महसूल विभागाने देखील स्वतंत्र तपासासाठी एस आय टीची स्थापना केलेली आहे.

पोलिसांनी आतापर्यंत जिल्हा भूमी अभिलेख कार्यालयातील अधिकाऱ्यांसह दोन बिल्डरांना अटक केलेली आहे या सर्व प्रकरणांमध्ये खोटे शिक्के सह्या आणि नकाशे बनवून देण्याच्या प्रकरणे या कार्यालयातील उपसंचालक श्रीकांत परदेशी यांना गुरुवारी सायंकाळी अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून अजून काय नवीन माहिती मिळते याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेलं आहे कारण परदेशी हे खोटे शिक्के खोटे नकाशे बनवून देत होते हे आता समोर आलेला आहे

# सोलापुरात धरणग्रस्त जमिनीच्या व्यवहारात गैरप्रकार; २४ जणांवर फौजदारी कारवाई

सोलापूर, दि. ९: धरणग्रस्त जमिनीच्या कथित बेकायदा व्यवहारातून फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी सलगर वस्ती पोलिस ठाण्यात तब्बल २४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी पंडित विरूपाक्ष शेटे याला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोलापूर शहराजवळील भाटेवाडी येथे वाडकर कुटुंबाला धरणग्रस्त म्हणून शासनाकडून जमीन मिळाली होती. सन २०१२ मध्ये संबंधित जमिनीच्या विक्रीसाठी मालकांनी कृष्ण कन्हैयादास शरदचंद्र देशमुख (रा. मंत्री चंडक, सोलापूर) यांच्यासोबत विक्रीचा करार केला होता. मात्र, करारानुसार जमीन हस्तांतरित न केल्याने देशमुख यांनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला. सुनावणीनंतर न्यायालयाने करारपत्राची अंमलबजावणी करून दोन महिन्यांच्या आत फिर्यादीच्या नावे जमीन खरेदीखत करून देण्याचे आदेश दिले. तसेच, प्रकरण निकाली निघेपर्यंत संबंधित जमिनीचा व्यवहार कोणत्याही तृतीय व्यक्तीसोबत करू नये, असेही स्पष्ट निर्देश दिले होते. तरीही न्यायालयाच्या आदेशाकडे दुर्लक्ष करून संबंधित जमीन पंडित विरूपाक्ष शेटे यांच्या नावे विकल्याचा आरोप आहे. खरेदीखत झाल्यानंतर शेटे यांनी महसूल नोंदीसाठी तलाठी कार्यालयात अर्ज केला. मात्र, फिर्यादी देशमुख यांनी हरकत घेतल्याने उताऱ्यावर नोंद होऊ शकली नाही. यानंतर या प्रकरणात फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला असून, या सर्व प्रकाराची गंभीर दखल घेत सलगर वस्ती पोलिसांनी २४ जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# मुख्यमंत्र्यांकडे धाव; मंगळवेढ्यातील जुगार-मटका बंद करण्याची मागणी

सोलापूर, दि. ९: मंगळवेढा तालुक्यातील बोराळे येथील अवैध दारू विक्रीविरोधात भाजप पदाधिकाऱ्यांनी कारवाईची मागणी केल्यानंतर आता मंगळवेढा शहरातील मटका आणि जुगाराचे अवैध अड्डे कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी भाजप शहराध्यक्ष नागेश डोंगरे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. गृहमंत्रीपदाची जबाबदारीही मुख्यमंत्र्यांकडे असल्याने या मागणीची शहर व तालुक्यात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

यासंदर्भातील निवेदन सोलापूर ग्रामीणचे पोलिस अधीक्षक आणि अपर पोलिस अधीक्षक यांनाही देण्यात आले आहे. निवेदनात शहर तसेच परिसरातील अनेक पानटपऱ्यांवर खुलेआम अवैधरित्या मटका सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही एजंट मोबाईलच्या माध्यमातूनही मटका स्वीकारत असल्याने या व्यवसायातून लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निवेदनानुसार, या अवैध व्यवसायांमुळे अनेक गरीब कुटुंबांचे आर्थिक नुकसान होत असून अनेक नागरिक कर्जबाजारी झाले आहेत. काहींना आपली जमीन व स्थावर मालमत्ता विकण्याची वेळ आल्याचा दावाही करण्यात आला आहे. तसेच शहरालगतच्या काही हॉटेल्स आणि आडोशाच्या ठिकाणी जुगाराचे अड्डेही मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे म्हटले आहे.

याशिवाय, अवैध धंद्यांची माहिती पोलिसांना दिल्यानंतर ती गोपनीय ठेवली जात नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे माहिती देणाऱ्या व्यक्तींना संबंधित अवैध धंदेवाल्यांकडून त्रास सहन करावा लागत असल्याचे नमूद करत, यापुढे माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवावी आणि शहरातील मटका व जुगार अड्ड्यांवर कायमस्वरूपी कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# शैक्षणिक कर्ज नाकारल्याने तरुणीचे वैमानिक होण्याचे स्वप्न अधांतरी; न्यायासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

रायगड, दि. ९ : वैमानिक होण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या माणगाव तालुक्यातील मीनाक्षी टोळकर हिच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक कर्ज नाकारण्यात आल्याने तिच्या प्रशिक्षणास मोठा अडथळा निर्माण झाला आहे. या प्रकरणी मीनाक्षीचे वडील रमेश टोळकर यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

मीनाक्षी टोळकर सध्या बारामती येथील अकॅडमी ऑफ कार्व्हर एव्हिएशन प्रा. लि. येथे वैमानिक प्रशिक्षण घेत असून या प्रशिक्षणासाठी सुमारे ४७.५० लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. या अनुषंगाने बँक ऑफ इंडिया, माणगाव शाखेकडे शैक्षणिक कर्जासाठी अर्ज करण्यात आला होता. कुटुंबाच्या म्हणण्यानुसार, गेल्या दीड वर्षात बँकेने मागितलेल्या विविध कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली. तसेच स्वतःची आणि नातेवाईकांची मिळून सुमारे ८० ते ९० लाख रुपयांची मालमत्ता तारण ठेवण्याची तयारीही दर्शविण्यात आली होती.

मात्र, प्रशिक्षणाचा कालावधी आणि कर्जफेडीच्या क्षमतेबाबत शंका व्यक्त करत बँकेने अखेरीस कर्ज मंजूर करण्यास नकार दिल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. प्रशिक्षण संस्थेने प्रत्यक्ष फ्लाईंग प्रशिक्षण पूर्ण होण्यासाठी दोन ते तीन वर्षे लागू शकतात, असे अधिकृतपणे स्पष्ट केले असतानाही त्याची पुरेशी दखल घेण्यात आली नसल्याचा आरोपही कुटुंबीयांनी केला आहे.

दीड वर्षांच्या प्रतीक्षेनंतर कर्ज नाकारण्यात आल्याने मीनाक्षीचे वैमानिक होण्याचे स्वप्न अधांतरी राहिल्याची भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने या प्रकरणात हस्तक्षेप करून बँकेच्या निर्णयाचा फेरविचार व्हावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

मी कोणतीही सवलत मागत नाही. मला फक्त माझ्या शिक्षणाचा हक्क आणि न्याय हवा आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया मीनाक्षी टोळकर हिने व्यक्त केली.

दरम्यान, या प्रकरणामुळे शैक्षणिक कर्ज मंजुरीची प्रक्रिया, व्यावसायिक शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला असून, या प्रकरणाकडे विद्यार्थी, पालक आणि सामाजिक क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# सोयाबीन बियाणे निकृष्ट, कारवाईची मागणी

अमरावती, दि. ९: यंदाच्या खरीप हंगामात धामणगावरेल्वे तालुक्यात बोगस व निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. वकनाथ येथील एका शेतकऱ्याच्या शेतात पेरणीनंतर एकही दाणा उगवला नसल्याने त्याच्यावर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. वकनाथ येथील शेतकरी जितेंद्र यादवराव सावरकर यांनी पुलगाव येथील कृषी सेवा केंद्रातून एका कंपनीचे सोयाबीन बियाणे खरेदी केले होते. २९ जून रोजी सर्वे क्रमांक २३ मधील शेतात ट्रॅक्टरद्वारे पेरणी करण्यात आली. मात्र आठ दिवस उलटल्यानंतरही शेतात एकही रोप उगवले नाही. विशेष म्हणजे, त्याच दिवशी शेजारच्या शेतकऱ्यांनी इतर कंपन्यांचे बियाणे पेरले असून त्या शेतांमध्ये उगवण समाधानकारक झाल्याचे दिसून आले आहे. या प्रकारामुळे शेतकरी सावरकर यांचे संपूर्ण शेत पडीत पडले आहे. यासंदर्भात त्यांनी कृषी अधिकारी, धामणगाव रेल्वे आणि देवळी यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. संबंधित कंपनी व कृषी सेवा केंद्राविरुद्ध कठोर कारवाई करावी तसेच बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

## पश्चिम रेल्वे

शुद्धिपत्रक

निविदा सूचना क्र.: बीसीटी/२६-२७/८८, दिनांक ०३.०७.२०२६. विद्यमान निविदा समाप्ती तारीख:२८.०७.२०२६. ती आता कृपया०४.०८.२०२६ अशी वाचावी. इतर सर्व अटी व शर्ती कायम राहतील. 0345

आम्हाला येथे लाईक करा facebook.com/WesternRly

## एअरपेस इंडस्ट्रीज लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** ए१००५, कनाकिया वॉल स्ट्रीट, अंधेरी कुर्ला रोड, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००९३.
**सीआयएन:** L29109MH2011PLC214373
**दूरध्वनी:** ०२२-६९२४५००० **ईमेल:** www.aerpace.com **वेबसाइट:** www.aerpace.com

### टपाल मतपत्रिका सूचना आणि ई-मतदान माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी विशेष कामकाजासाठी कंपनीच्या सदस्यांची मंजुरी टपाल मतपत्रिकेद्वारे, केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करून ('रिमोट ई-व्होटिंग') मिळवू इच्छित आहे, जसे की टपाल मतपत्रिकेच्या सूचनेत नमूद केले आहे, जी कंपनीच्या वेबसाइट www.aerpace.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) च्या वेबसाइट www.evoting.nsdl.com वर आणि बीएसई लिमिटेडच्या वेबसाइट www.bseindia.com वर अनुक्रमे उपलब्ध आहे.

कंपनीच्या सदस्यांना याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या कलम ११० सह कलम १०८ आणि इतर लागू तरतुदी (असल्यास) आणि त्याअंतर्गत बनवलेले लागू नियम आणि भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेल्या लागू सामान्य परिपत्रकांनुसार ('एमसीए परिपत्रके'), एअरपेस इंडस्ट्रीज लिमिटेड ('कंपनी') ने शुक्रवार, ०३ जुलै, २०२६ या कट-ऑफ तारखेपर्यंत कंपनीकडे किंवा डिपॉझिटरीजकडे नोंदणीकृत असलेल्या आपल्या सदस्यांना मंगळवार, ०९ जुलै, २०२६ रोजी ईमेलद्वारे पोस्टल बॅलेट नोटीस पाठवण्याचे काम पूर्ण केले आहे.

शुक्रवार, ०३ जुलै, २०२६ ('कट-ऑफ तारीख') रोजी डिपॉझिटरीद्वारे ठेवलेल्या सभासदांच्या नोंदवहीमध्ये किंवा लाभधारक मालकांच्या नोंदवहीमध्ये ज्या सभासदांची नावे नोंदवलेली आहेत, ते टपाल मतदानाच्या सूचनेमध्ये समाविष्ट असलेल्या कार्यसूचीच्या संबंधात मतदान करण्यास पात्र आहेत. असे कामकाज केवळ इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करून टपाल मतदानाच्या माध्यमातूनच पार पाडले जाईल. ई-मतदानाचा सोयीस्कर वापर करण्यासाठी सभासदांना विनंती आहे की, त्यांनी आपला ईमेल आयडी आणि मोबाईल क्रमांक आपापल्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे (डीपी) अद्ययावत करावा.

कंपनीने सभासदांना ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (NSDL) ची सेवा घेतली आहे. ई-मतदानासाठीची सविस्तर प्रक्रिया/सूचना टपाल मतपत्रिका सूचनेचा भाग आहेत. या संदर्भात, सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की:

१. टपाल मतपत्रिकेद्वारे करण्यात येणारे व्यवहार खालीलप्रमाणे आहेत-
   ए. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य वित्तीय अधिकारी म्हणून श्री. आनंद मनोज शाह यांच्या नियुक्तीसाठी मंजुरी मागणे.
   बी. उपकंपनीने तृतीय पक्षासोबत केलेल्या महत्त्वपूर्ण व्यवहारांच्या मंजुरीसाठी अर्ज करणे.
   सी. कंपनी आणि एअरपेस रोबोटिक्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या दरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्षांच्या व्यवहारांसाठी मंजुरी मिळवण्याकरिता.
   डी. कंपनी आणि एअरपेस कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या दरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्षांच्या व्यवहारांसाठी मंजुरी मिळवण्याकरिता.
   ई. कंपनी आणि एअरपेस सुपरकार्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या दरम्यानच्या महत्त्वपूर्ण संबंधित पक्षांच्या व्यवहारांसाठी मंजुरी मिळवण्याकरिता.
   एफ. आकस्मिक रिक्त जागा भरण्यासाठी सचिवीय लेखापरीक्षकांची नियुक्ती
   जी. कंपनीच्या अ-कार्यकारी स्वतंत्र संचालक म्हणून सुश्री अंशू शुक्ला पांडे (ऊखछ: ११८०९९३२) यांची नियुक्ती.
   एच. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १८०(१)(ल) अन्वये कंपनीच्या कर्ज घेण्याच्या अधिकारांमध्ये वाढ.
   आय. प्राधान्य तत्त्वावर वॉरंट्सचे निर्गमन
२. दूरस्थ ई-मतदान सुविधा खालील कालावधीत उपलब्ध असेल:

| | |
|---|---|
| दूरस्थ ई-मतदान कालावधीचा प्रारंभ | **शुक्रवार, १० जुलै, २०२६ रोजी सकाळी ०९.०० वाजता (भा.प्र.वे.)** |
| दूरस्थ ई-मतदान कालावधीची समाप्ती | **शनिवार, ०८ ऑगस्ट, २०२६ रोजी संध्याकाळी ०५.०० (भा.प्र.वे.)** |

३. शनिवार, ०८ ऑगस्ट , २०२६ रोजी सायंकाळी ५.०० नंतर ई-मतदान सुविधेला परवानगी दिली जाणार नाही.
४. टपाल मतपत्रिकेसंबंधी कोणतीही तक्रार कंपनीकडे infoaerpace.com या ई-मेलवर किंवा आरटीए **पूर्वा शेअररजिस्ट्री इंडिया प्रायव्हेट लिमिटेड** येथे evoting@purvashares.com वर संपर्क साधा. एनएसडीएल ई-व्होटिंग सिस्टममधून ई-व्होटिंग संदर्भात कोणत्याही प्रश्नांसाठी किंवा समस्येसाठी, तुम्ही evotingndsl.co.in वर ईमेल लिहू शकता किंवा ०२२-४८८६७००० वर संपर्क साधू शकता.
५. ज्या सदस्यांनी आपला ई-मेल आयडी अद्ययावत केलेला नाही आणि ज्यांना पोस्टल बॅलेट नोटीस हवी आहे, त्यांनी आवश्यक तपशील जसे की फोलिओ क्रमांक, भागधारकाचे नाव, शेअर प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (पुढील आणि मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन केलेली प्रत), आधार ( आधार कार्डची स्व-साक्षांकित प्रत ) देऊन, कंपनीला info@aerpace.com या ई-मेलवर किंवा आरटीए **पूर्वा शेअररजिस्ट्री इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,** evoting@purvashares.com येथे अशा नोटीससाठी विनंती करावी.
६. ई-मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर, छाननीकर्ता आपला अहवाल कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक/कंपनी सचिवांना सादर करेल. टपाल मतपत्रिका प्रक्रियेद्वारे घेण्यात आलेल्या ई-मतदानाचा निकाल, छाननीकर्त्याच्या अहवालासह, १० ऑगस्ट २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी जाहीर केला जाईल.

हीच माहिती कंपनीच्या www.aerpace.com या वेबसाइटवर प्रदर्शित केली जाईल आणि बीएसई लिमिटेडलाही कळवली जाईल, जिथे कंपनीचे इक्विटी शेअर्स सूचीबद्ध आहेत.

**मंडळाच्या आदेशानुसार**

**एअरपेस इंडस्ट्रीज लिमिटेड करिता**
**आनंद मनोज शाह**
**व्यवस्थापकीय संचालक आणि उत्रज्ञ**
DIN: 11709310

**दिनांक: १०.०७.२०२६**
**ठिकाण: मुंबई**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given on behalf of my client, **Mr. Bhushan Devlekar**, that the original Agreement for Sale dated **11/12/1989** executed between **M/s. Shantistar Builders** and **Mr. Olakkingil Antony Jose** in respect of **Flat No. C-33/301, Sector-10, Jeevan Sarita CHSL, Shantinagar, Mira Road (East), Thane - 401107** has been lost / misplaced and is not traceable despite diligent search.

Any person(s), bank(s), financial institution(s) or any other claimant(s) having any right, title, interest, claim or objection in respect of the said original Agreement for Sale or the aforesaid property are hereby required to submit the same in writing with supporting documents to the undersigned within **15 (Fifteen) days** from the date of publication of this notice.

Failing which such claim or objection, if any, shall be deemed to have been waived and my client shall be at liberty to proceed with the transaction and obtain duplicate / certified copy or complete the proposed transaction without any further reference to such claim, if any.

Sd/-
**ADVOCATE B. K. MISHRA**
Office : Shubh Mangal Karyalay, Opp. Bandra Small Cause Court, Mumbai.
Mobile No. 8454920758
**Date : 10.07.2026** **Place : Mumbai**

## जाहीर सूचना

सदर सार्वजनिक सुचनेद्वारे मी तमाम जनतेस माझे अशिल **श्री. सोनू बाबाजी जोगळे** राहणार इमारत क्र. १, सदनिका क्र. ६२१, न्यु टेक्नीकल एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, न्यु टेक्नीकल एरीया, मरोळ पाईप लाईन, सहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९ यांच्या वतीने सुचित करतो की, त्यांची पत्नी **श्रीमती सुनीता सोनू जोगळे** यांचा दि. ३१/०१/२०२४ रोजी मृत्यु झालेला आहे. तसेच त्यांच्या पश्चात माझे अशिल एकमेव वारसदार आहेत. तरी **श्री. सोनू बाबाजी जोगळे** राहणार इमारत क्र. १, सदनिका क्र. ६२१, न्यु टेक्नीकल एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, न्यु टेक्नीकल एरीया, मरोळ पाईप लाईन, सहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९. या ठिकाणी असून सदर सदनिका झोपुप्रा परिपत्रक क्र. १५२ नुसार वारस हक्काने माझे अशिलांच्या नावे करण्यासाठी आवश्यक कागद पत्रांसहित संस्थेकडे प्रस्ताव सादर करणार आहेत. तरी कोणत्याही व्यक्तीकडे किंवा वारसाकडे सदर मालमत्ता/तीचा काही भाग बाबतीत कोणत्याही व्यक्तीकडे विक्री, विनिमय, तारण, भाडे, कर्ज शुल्क, अधिकार, बदली, समभाग, रूची, देखभाल, परवाना, भेट, वारसा, सामायिकता, मालकी, ताबा किंवा अन्य स्वरुपात कोणताही दावा / हक्क / आक्षेप असल्यास त्यांनी हि जाहिर सुचना प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह अध्यक्ष/सचिव, न्यु टेक्नीकल एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, न्यु टेक्नीकल एरीया, मरोळ पाईप लाईन, सहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९ यांचेकडे किंवा माझ्या अशिलांना किंवा मला माझ्या खालील कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा. जर असे कोणतेही दावे न मिळाल्यास उपरोक्त रुम/सदनिका किंवा त्याचा काही भाग इत्यादी बाबत कोणाचीही कसलीच हरकत नाही असे समजले जाईल व **श्री. सोनू बाबाजी जोगळे** यांना झोपुप्रा परिपत्रक क्र. १५२ नुसार हस्तांतरण करुन घेण्यास मोकळीक राहिल. तसेच जर कोणाचेही दावे / हरकती १५ दिवसानंतर कोणत्याही स्वरूपात मिळाल्यास/सादर केल्यास ते सोडून दिले किंवा माफ केले असे समजून स्विकारले जाणार नाहीत.

दिनांक: १०/०७/२०२६ **चंद्रशेखर आर. कनोजिया**
ठिकाण: अंधेरी, मुंबई **वकील - मुंबई उच्च न्यायालय**

कार्यालयः खोली क्र. १, बीजेपी कार्यालयाजवळ, मरोळ पाईप लाईन, ए.के. रोड, अंधेरी पुर्व, मुंबई-५९. मोबा.: ९०२२२२३३७०, कार्या.: ८९७६९७३३७०, ई-मेल: kanojia008@gmail.com

## जाहीर सूचना

येथे सर्वसामान्य जनतेला याद्वारे सूचना देण्यात येते की, माझे अशील **श्री. किरण चंद्रशेखर राव** यांनी सदर सोसायटीमधील **फ्लॅट/रुम नं. १११** च्या संदर्भातील सदस्यत्व, शेअर प्रमाणपत्र आणि सर्व हक्क, मालकी व हितसंबंध त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला आहे. सदर फ्लॅट मूळतः **दिवंगत श्री. राव चंद्रशेखर आर.,** ज्यांचे दिनांक **१८/०९/२००५** रोजी निधन झाले, आणि **दिवंगत श्रीमती. मोहिनी चंद्रशेखर राव,** ज्यांचे दिनांक **१२/०३/२०१३** रोजी निधन झाले, यांच्या नावावर होता.

दिवंगतांच्या पश्चात खालील कायदेशीर वारसदार आहेत:
**१. श्री. किशोर चंद्रशेखर राव – मोठा मुलगा (वय ४२ वर्षे)**
**२. श्री. किरण चंद्रशेखर राव – मुलगा (वय ३९ वर्षे)**
**३. श्रीमती. अरुणा पद्मनाभ गोल्ला (पूर्वीची अरुणा चंद्रशेखर राव) – मुलगी (वय ४० वर्षे)**

वरील कायदेशीर वारसांनी **श्री. किरण चंद्रशेखर राव** यांच्या बाजूने आवश्यक प्रतिज्ञापत्र, घोषणापत्र आणि नाहरकत प्रमाणपत्र निष्पादित केले आहे; आणि सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आदर्श उपविधींच्या उपविधी क्र. **३५** आणि लागू असलेल्या एस.आर.ए. परिपत्रकांनुसार उपरोक्त फ्लॅटच्या संदर्भातील सदस्यत्वासाठी आणि शेअर्स व हितसंबंधांच्या हस्तांतरणासाठी अर्ज करण्यास त्यांना प्राधिकृत केले आहे. त्यामुळे, कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था किंवा प्राधिकरणाचा उपरोक्त फ्लॅट, सदस्यत्व किंवा शेअर प्रमाणपत्राच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, मालकी, हितसंबंध, बोजा, धारणाधिकार, गहाणखत, वारसाहक्क, उत्तराधिकार, आक्षेप, वाद किंवा कोणत्याही स्वरूपाची मागणी असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून **१५ (पंधरा) दिवसांच्या** आत, खालील स्वाक्षरी करणाऱ्या अधिवक्त्यांकडे आणि "**न्यू टेक्निकल एस.आर.ए. को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.**" च्या अध्यक्ष/सचिवांकडे वरील पत्त्यावर पुराव्यांच्या कागदपत्रांसह आपले म्हणणे लेखी स्वरूपात सादर करावे. जर विहित मुदतीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त झाला नाही, तर असे गृहीत धरले जाईल की सदर फ्लॅटच्या संदर्भात कोणाचाही कोणताही आक्षेप किंवा दावा नाही आणि सोसायटी इतर कोणत्याही व्यक्तीचा संदर्भ न घेता **फ्लॅट नं. १११** चे सदस्यत्व, शेअर प्रमाणपत्र आणि सर्व हक्क, मालकी व हितसंबंध **श्री. किरण चंद्रशेखर राव** यांच्या नावे हस्तांतरित करण्यास मुक्त असेल. त्यानंतर प्राप्त झालेला कोणताही दावा किंवा आक्षेप हा सोडून दिला असल्याचे मानले जाईल आणि त्याची दखल घेतली जाणार नाही.

दिनांक: १०/०७/२०२६ **चंद्रशेखर आर. कनोजिया**
ठिकाण: मुंबई **वकील - मुंबई उच्च न्यायालय**

कार्यालयः खोली क्र. १, बीजेपी कार्यालयाजवळ, मरोळ पाईप लाईन, ए.के. रोड, अंधेरी पुर्व, मुंबई-५९. मोबा.: ९०२२२२३३७०, कार्या.: ८९७६९७३३७०, ई-मेल: kanojia008@gmail.com

## जाहीर सूचना

येथे सर्वसामान्य जनतेस जाहीर नोटीस देण्यात येते की, माझे अशील **श्री. विशाल प्रभाकर पवार** यांनी सदर संस्थेमधील **फ्लॅट/रूम नं. २०८** च्या संदर्भात सदस्यता, भाग प्रमाणपत्र आणि सर्व हक्क, मालकी व हितसंबंध त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला आहे. सदर फ्लॅट मूळतः **कै. श्रीमती. स्मिता प्रभाकर पवार** यांच्या नावावर होता, ज्यांचे दिनांक **११/०७/२०१९** रोजी निधन झाले आहे आणि त्यांचे पती **कै. श्री. प्रभाकर मणका पवार** यांचे त्यापूर्वीच दिनांक **०६/०४/१९९९** रोजी निधन झाले होते.

दिवंगत व्यक्तीच्या पश्चात खालील कायदेशीर वारसदार आहेत:
**१. श्री. विशाल प्रभाकर पवार – मोठा मुलगा (वय ४२ वर्षे)**
**२. श्री. अनिकेत प्रभाकर पवार – मुलगा (वय ३८ वर्षे)**
**३. श्रीमती पूर्वा प्रवीण साळवी (पूर्वीची शीतल प्रभाकर पवार) – मुलगा/कन्या (वय ४५ वर्षे)**

वरील कायदेशीर वारसांनी **श्री. विशाल प्रभाकर पवार** यांच्या बाजूने आवश्यक ते प्रतिज्ञापत्र, घोषणापत्र आणि नाहरकत प्रमाणपत्र निष्पादित केले असून, त्यांना सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या आदर्श उपविधींच्या उपविधी क्र. **३५** आणि लागू असलेल्या एस.आर.ए. परिपत्रकांनुसार उपरोल्लेखित फ्लॅटच्या संदर्भात सदस्यता, भाग प्रमाणपत्र आणि सर्व हक्क, मालकी व हितसंबंध हस्तांतरित करण्यासाठी अर्ज करण्यास प्राधिकृत केले आहे. त्यामुळे, कोणत्याही व्यक्ती, संस्था, बँक, वित्तीय संस्था किंवा प्राधिकरणाचा उपरोल्लेखित फ्लॅट, सदस्यता किंवा भाग प्रमाणपत्राच्या संदर्भात कोणताही दावा, हक्क, मालकी, हितसंबंध, बोजा, धारणाधिकार, गहाणखत, वारसाहक्क, उत्तराधिकार, आक्षेप, वाद किंवा कोणत्याही प्रकारची मागणी असल्यास, त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून **१५ (पंधरा) दिवसांच्या** आत, आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह, लेखी स्वरूपात खालील स्वाक्षरी करणाऱ्या अधिवक्त्यांकडे आणि **न्यू टेक्निकल एस.आर.ए. को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि.** च्या अध्यक्ष/सचिवांकडे वरील पत्त्यावर सादर करावे. सदर मुदतीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, असे गृहीत धरले जाईल की सदर फ्लॅटच्या संदर्भात कोणाचाही कोणताही दावा किंवा आक्षेप नाही आणि संस्था कोणत्याही व्यक्तीचा पुढील संदर्भ न घेता **फ्लॅट नं. २०८** चे सदस्यत्व, भाग प्रमाणपत्र आणि सर्व हक्क, मालकी व हितसंबंध **श्री. विशाल प्रभाकर पवार** यांच्या नावावर हस्तांतरित करण्यास स्वतंत्र असेल. त्यानंतर प्राप्त झालेला कोणताही दावा किंवा आक्षेप हा सोडून दिला असल्याचे मानले जाईल आणि त्याची दखल घेतली जाणार नाही.

दिनांक: १०/०७/२०२६ **चंद्रशेखर आर. कनोजिया**
ठिकाण: मुंबई **वकील - मुंबई उच्च न्यायालय**

कार्यालयः खोली क्र. १, बीजेपी कार्यालयाजवळ, मरोळ पाईप लाईन, ए.के. रोड, अंधेरी पुर्व, मुंबई-५९. मोबा.: ९०२२२२३३७०, कार्या.: ८९७६९७३३७०, ई-मेल: kanojia008@gmail.com

## PUBLIC NOTICE

I, **GAURISHANKAR MOHAN PAGARE** (Aged 30), residing at Room No. 128, Building No. 06, Santacruz Police Colony, Near Santacruz (West), Mumbai Suburban, Maharashtra-400054. On dated 01/06/2026, I boarded the 11057 Amritsar Express from CSMT Railway Station (Platform No. 18, General Coach towards the Kalyan end) to travel to Chalisgaon for bank-related work. I arrived at CSMT station around 23:20 hours. Upon checking, I realized my black-colored rucksack (Bag) which I had hung on the hook near my seat was missing. I searched the surrounding area but could not find it. After the train departed from the platform at approximately 23:35 hours, I became certain that an unknown person had taken the bag, mistaking it for their own. I subsequently inquired if the bag had been deposited anywhere, but learned it had not been turned in. It appears that the person who took the rucksack kept it for personal gain instead of depositing it at a police station or government office. The description of my stolen rucksack and the documents inside is as follows...

**1) A black-colored satchel/bag containing:**
**2) Own Aadhaar Card (No. 310835012166) and wife Shakuntala Gaurishankar Pagare's Aadhaar Card (No. 834859335456).**
**3) Original agreement for sale (Document Serial No. 3268, dated 19/05/2011).**
**4) Original agreement for sale (Document Serial No. 2-02738-2011, dated 18/04/2011).**
**5) Agreement documents executed with an engineer.**

If found return to the above mentioned address. Claims or objections are hereby invited from the claimants or objectors, who are having claim or objection on the basis of the said lost Documents. Inform to undersigned within period of **15 days** from the publication of this notice failing which any claim or objection will not be considered.

Sd/-
**GAURISHANKAR MOHAN PAGARE**
Mobile No. 7977532289, Email ID : pagaregaurishankar133@gmail.com

## परिशिष्ट क्र.१६
## (उपविधी क्र.३५ अन्वये)

नोटीसचे स्वरूप, शेअर्सच्या हस्तांतरणासाठी दावे किंवा हरकती आणि सोसायटीच्या भांडवल/ मालमत्तेतील मृत सदस्याचे हित.

### जाहीर नोटीस

**विशाल सह्याद्री को-ऑप.हौसिंग सोसायटी लि., सह्याद्रीनगर,चारकोप,कांदिवली प.,मुंबई-४०० ०६७** या संस्थेचे सभासद असलेल्या संस्थेच्या इमारतीमधील **सदनिका क्र.५३, इमारत क्रमांक सी-२२** धारण करणारे **श्री. विश्वास भाउसो निगडे यांचे दिनांक १७/१२/२०२४** रोजी निधन झालेले आहे.तसेच त्यांच्या **पत्नी श्रीमती कुंकावती विश्वास निगडे** या वारसदार असुन त्यांचा **मुलगा श्री. संतोष विश्वासराव निगडे** यांना नोंदणीकृत संस्थेतील मृत सभासदाने भागभांडवल मालमत्तेतील शेअर्स १०० टक्के हस्तांतरीत करण्याचे सदनिकेचे सभासदत्व देणेच्या प्रयोजनार्थ ही जाहीरात प्रसिध्द करण्यात येत असुन, प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून **१५** दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या व हरकतींच्या आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती व अन्य पुरावे संस्थेकडे सादर करावेत. जर, वर नमुद केलेल्या मुदतीमध्ये कोणाही व्यक्तीकडुन हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध वरील मागणीदार याचे नावे हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधी नुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्क मागण्या/ किंवा हरकती आल्या नाहीत तर त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. याची नोंद घ्यावी व उपविधीची प्रत मागणीदारास / हरकतदारास पाहण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात पत्त्यावर **सकाळी १०.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत सचिव** यांचेकडे कार्यालयीन वेळेत नोटीस दिल्याच्या तारखेपासुन नोटीशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

**ठिकाण:- मुंबई**
**दिनांक :- १०.०७.२०२६**

**सही/-**
**(ॲड.आर. एस. यादव.)**
**एम.कॉम./एलएल. बी.**
**७/ए विंग ००४, शिवनेरी सी.एच.एस लि., संघर्षनगर, चांदिवली फार्म रोड, साकीनाका, अंधेरी पुर्व, मुंबई - ४०० ०७२**

## फॉर्म क्र. यूआरसी २

अधिनियमाच्या अध्याय २१ च्या भाग १ अंतर्गत नोंदणीबद्दल सूचना देणारी जाहिरात.
(कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३७४(ब) आणि कंपनी (नोंदणीसाठी अधिकृत) नियम, २०१४ च्या नियम ४(१) नुसार)

**१.** याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ३६६ च्या उप-कलम (२) नुसार, यानंतर पंधरा दिवसांनी परंतु यानंतर तीस दिवसांची मुदत संपण्यापूर्वी, मुंबई, महाराष्ट्र येथील निबंधकांकडे असा अर्ज सादर करण्याचा प्रस्ताव आहे की, रूपराज इन्फॉर्मेटिक्स अँड स्पेसेस एलएलपी (RUPRAJ INFORMATICS SPACES LLP) ची नोंदणी कंपनी अधिनियम, २०१३ च्या अध्याय २१ च्या भाग १ अंतर्गत, समभागांद्वारे मर्यादित कंपनी (Company limited by shares) म्हणून केली जावी.

२. कंपनीची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:
   **अ.** भारतातील विविध उद्योगांमधील व्यवसायांद्वारे केल्या जाणाऱ्या सर्व प्रक्रिया, व्यवहार, उपक्रम आणि इतर सर्व कामांसाठी आउटसोर्सिंग सेवा प्रदान करण्याबरोबरच, कॉल सेंटर व्यवस्थापन, डेटा प्रोसेसिंग, बॅक-ऑफिस प्रोसेसिंग, डेटा वेअरहाउसिंग आणि डेटाबेस व्यवस्थापन यांसारख्या आयटी-सक्षम सेवांचा व्यवसाय करणे.
   **आ.** आयटी आणि आयटीईएस-सक्षम उपक्रमांमध्ये गुंतलेल्या कंपन्यांना कार्यालये, व्यावसायिक मालमत्ता आणि संकुले यांसारख्या स्थावर मालमत्ता आणि/किंवा कार्यालयीन उपकरणे, वातानुकूलित यंत्रे, इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे भाडेपट्ट्यावर किंवा भाड्याने देण्याचा व्यवसाय करणे.

**३.** प्रस्तावित कंपनीच्या मसुदा मेमोरँडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशनची एक प्रत ईसी ६०१०, भारत डायमंड बोर्स, जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, नाबार्ड हेड ऑफिस, बांद्रा ई, मुंबई, महाराष्ट्र, ४०००५१ येथील कार्यालयात पाहता येईल.

**४.** याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, या अर्जावर आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तीने आपला आक्षेप, या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून एकवीस दिवसांच्या आत, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात एक प्रत पाठवून, सेंट्रल रजिस्ट्रेशन सेंटर (सीआरसी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स (आयआयसीए), प्लॉट नं. ६,७,८, सेक्टर ५, आयएमटी मानेसर, जिल्हा गुडगाव (हरियाणा), पिन कोड-१२२०५० येथील रजिस्ट्रारकडे लेखी स्वरूपात कळवावा.

दिनांक ९ जुलै २०२६

**रूपराज इन्फॉर्मेटिक्स अँड स्पेसेस एलएलपी साठी**

| | | | |
|---|---|---|---|
| **राजेंद्र चंपकलाल देसाई** | **रूपा राजेंद्र देसाई** | **हमीर राजेंद्र देसाई** | **श्वेता हमीर देसाई** |
| **नियुक्त भागीदार** | **नियुक्त भागीदार** | **नियुक्त भागीदार** | **नियुक्त भागीदार** |
| **डीआयएन :** | **डीआयएन :** | **डीआयएन :** | **डीआयएन :** |
| **०१३५९६७१** | **०९१०४१७८** | **०१३५९८४६** | **०९१०४१८१** |